# 9 प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने

**प्रा**चीन भारताचा इतिहास हा एक वैभवशाली इतिहास आहे. भारताला पाच हजार वर्षांचा प्राचीन इतिहासाचा वारसा आहे. भारताला राजसत्ता, संस्कृती, धर्म, सुसंस्कृत, सामाजिक जीवन, समृद्ध आर्थिक जीवन व व्यापार यांची वैभवशाली परंपरा आहे; पण आधुनिक अर्थाने शास्त्रीय पद्धतीने प्राचीन काळात भारतात इतिहास लेखन झाले नाही. भारतीयांच्या या ऐतिहासिक दृष्टीच्या अभावामुळे पाश्चिमात्य इतिहास लेखन परंपरेसारखी परंपरा निर्माण होऊ शकली नाही.

प्राचीन भारताच्या इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करत असतांना विद्वानांमध्ये जे दोन भिन्न मतप्रवाह आढळतात ते म्हणजे एक प्राचीन भारतीय लोकांना ऐतिहासिक दृष्टीचा अभाव होता आणि दुसरा म्हणजे प्राचीन भारतीयांना काही प्रमाणात का असेना पण त्यांना इतिहासाची जाणीव होती. असे दोन मतप्रवाह आहेत. प्राचीन भारतीयांना ऐतिहासिक दृष्टी नव्हती हा दावा करणाऱ्यात पाश्चात्य इतिहासकारांची संख्या जास्त आहे. पाश्चात्य इतिहासकार एल्फिस्टन म्हणतो की, आलेक्झांडरच्या भारतावरील आक्रमणापूर्वीची भारताच्या इतिहासाची तिथी निश्चित करता येत नाही. त्याच्या या मताचे समर्थन करणारे इतिहासकारामध्ये कर्नल टॉड, अल्बेरुनी, फ्लिट, कॉवेल, जर्मन पंडीत मॅक्समुलर, ब्रिटीश गव्हर्नर एल्फिस्टन इ. इतिहासकार आहेत.

वरील सर्व इतिहासकारांच्या मतांचे खंडन करणारा दुसरा इतिहासकारांचा एक वर्ग आहे; दुसऱ्या वर्गाचा असा दावा आहे की, भारतीयांनी पाश्चिमात्यासारखा परिपूर्ण ऐतिहासिक ग्रंथ निर्माण करता आला नसेल परंतु एक गोष्ट निश्चित की ग्रंथ निर्मिती करताना प्राचीन

भारतीयांनी इतिहासाच्या सुरक्षिततेची भरपूर काळजी घेतली आहे. भारतीयांनी इतिहासाचे संकलन करत असतांना बरेच ऐतिहासिक ग्रंथ लिहिले. यावरुन भारतीयांना काही प्रमाणात का असेना इतिहासाचे ज्ञान होते असे म्हणावे लागेल. मात्र भारतीयांना प्राचीन काळात इतिहासाचे अजिबातच ज्ञान नव्हते त्यांना ऐतिहासिक दृष्टी नव्हती असे म्हणणे धाडसाचे होईल. कौटील्याचे अर्थशास्त्र आणि काही उपनिषदांमध्ये इतिहासाचे महत्त्व विषद करण्यात आले असून इतिहासाला पंचमवेद मानण्यात आले आहे. पुराणात देखील म्हटले आहे की, जर आम्हाला वेद समजून घ्यावयाचे असतील तर प्रथम इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. कल्हण राज तरंगिणीमध्ये म्हणतो, तोच कवि प्रशंसेस पात्र आहे की जो कोणताही पुर्वग्रह किंवा राग-द्वेश मनात न बाळगता केवळ सत्य सांगतो. "कल्हणचे हे विधान एका प्रामाणिक इतिहासाकडे घेवून जाणारे आहे. भारतीय इतिहास काराप्रमाणेच पाश्चात्य इतिहासकार विल्सन हा प्राचीन भारतीयांत ऐतिहासिक प्रतिभा व जाण असल्याचे मान्य करतो.

**इतिहास म्हणजे काय ?**

इतिहास या शब्दाची फोड इति + ह + आस अशी आहे. याचा अर्थ हे असे घडले असा आहे. किंवा मागच्या क्षणापर्यंत जे घडले तो सर्व इतिहास होय. इंग्रजीतील History या शब्दाचे मुळ Historia या ग्रीक शब्दात सापडते. याचा अर्थ 'जिज्ञासेने संशोधन करुन नव्या माहितीचा शोध असा होतो.' History या शब्दाचा विग्रह His + Story म्हणजे त्याची गोष्ट असा होतो. भुतकाळात ज्या उल्लेखनीय व संस्मरणीय घटना व घडामोडी झाल्या, त्यांचा साद्यांत वृत्तांत म्हणजे इतिहास होय.

**इतिहासाच्या व्याख्या :**

**कार्लाईल (Carlyle) :** भुतकालीन थोर व्यक्तींचे चरित्रे म्हणजे इतिहास होय.

**थ्यूसिडाईड्स (Thucydides) :** "अनुभवाच्या सहाय्याने तत्त्वज्ञानाचे अध्यापन करणे म्हणजे इतिहास होय."

**अर्नाल्ड टॉयन्बी :** "इतिहास म्हणजे इतर काही नसून केवळ संस्कृतीचा उदय व अस्त आहे."

**हॅपोल्ड (Happold) :** "इतिहास हा अनुभवाचा नंदादीप आहे" असे मानतो.

**कीटिंगच्या (Keating) मते,** इतिहास ही मानवी कृतीची नोंद होय.

**ब्लॉच (Bloch) या विचारवंताच्या मते,** "इतिहास म्हणजे विशिष्ट काळातील मानवाचे शास्त्र होय."

**रॉबर्ट डॅनिएल :** "मानव समुहांच्या अनुभवाची स्मृती म्हणजे इतिहास होय."

**प्रा.इ.एच कार :** "वर्तमानकाळ व भुतकाळ यांच्यामधील कधीही न संपणारा संवाद म्हणजे इतिहास होय."

**सर जॉन सीली :** "इतिहास म्हणजे भुतकाळातील राजकारण होय."

**अर्नालॅंड टायन्बी :** "इतिहास म्हणजे संस्कृतीच्या उदयास्ताची नोंदणी होय."

**कार्ल मार्क्स :** आर्थिक दृष्टीकोणातून इतिहासाचा अर्थ "आहेरे आणि नाहीरे वर्गातील संघर्ष" म्हणजे इतिहास.

**महाकवी रविंद्रनाथ टागोर :** "मनुष्याचा इतिहास हाच एकमेव इतिहास होय."

**वि.द.घाटे :** यांच्या मते, "मानवी प्राण्याचा पृथ्वी तलावरील उत्क्रांतीचा शास्त्रशुद्ध अभ्यास म्हणजे इतिहास होय."

**जॉन हर्डर :** "इतिहास म्हणजे घटनांची एक साखळी होय."

**हेरॅडॉटस :** "इतिहास म्हणजे गतकाळातील अविस्मरणीय घटनांचा शोध"

हा ग्रीस इतिहासकार इतिहासाचा मूळ जनक समजला जातो. इ.पू. पाचव्या शतकात त्याने या विषयाला स्वतंत्र स्थान प्राप्त करुन दिले. एका पिढी आधी झालेल्या युद्धाविषयी लेखन करण्यापूर्वी त्याने ग्रीस देशाचा व्यापक प्रवास केला. घटना, स्थळे प्रत्यक्ष पाहिली आणि त्या युद्धासंबंधीचे मौखिक वृत्तांत ऐकले. तो जेथे जेथे गेला तेथे तेथे जे जे मनोरंजक, संस्मरणीय व वैशिष्ट्यपूर्ण माहिती त्याने संपादन केली. हाच त्याचा सत्याचा शोध इतिहासविषयक साधनसामुग्री मिळेवण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न व घेतलेले श्रम हे महत्त्वपूर्ण होते. हेरॉडॉट्सच्या वर्णन पद्धतीमुळे ग्रीक लोक प्रभावित झाले. आणि नंतरच्या शतकात त्याच्या लेखन प्रकाराला हेस्टोरी (Historie) किंवा हिस्टोरीया (Historia) असे संबोधण्यास त्यांनी सुरुवात केली. तत्कालीन ग्रीक कल्पनेप्रमाणे भुतकाळातील घटना ग्रंथित केलेले साहित्य म्हणजे इतिहास होय.

**इतिहासाचे महत्त्व :**

इतिहासाचा अभ्यास वर्तमान काळातील समस्या सोडविण्यासाठी होऊ शकतो. तसेच भविष्य काळाची वाटचाल करण्यासाठी भुतकाळातील घडलेल्या घटनांचा अभ्यास उपयोगी ठरु शकतो. माणूस काय करु शकतो हे ओळखण्याचे गमक म्हणजे मानवाने काय केले आहे हे पाहणे होय. इतिहासाचे महत्त्व एवढे व्यापक आहे की, सर्व भाषा, सर्व शास्त्रे, ज्ञान-विज्ञान या सर्वानांच इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. एवढे व्यापक महत्त्व इतिहासाचे

आहे. या स्पर्धात्मक युगात कालचा भुतकाळ धुंडाळावा लागतोच.

**भारतीय इतिहासातील कालखंड :**

भारताच्या इतिहासाचा अभ्यास करताना भारतीय इतिहासकारांनी हिंदू कालखंड, मुस्लिम कालखंड व ब्रिटीश कालखंड असे ढोबळ मानाने विभाजन केलेले होते. रानटी अवस्थेकडून प्रगत अवस्थेकडे वाटचाल करताना मानवी उत्क्रांतीचा कालखंड ढोबळ मानाने ठरवता येतो. पण कोणत्या वर्षापासून प्राचीन कालखंड संपला व कोणत्या वर्षापासून मध्ययुगीन कालखंड सुरु झाला हे निश्चित सांगता येत नाही. कारण समाज व्यवस्थेतील बदल शतकानुशतके हळूवारपणे होत असल्याचे दिसतात. साधारणपणे जेव्हा धर्मसत्ता व राजसत्ता यांच्या संवाद होतो, त्यांची वाटचाल एकत्रितपणे परस्पर पूरकरित्या चालत होती, त्यास आपण प्राचीन कालखंड असे म्हणतो. ज्या काळात धर्मसत्तेचे प्राबल्य वाढले. राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता वरचढ झाली. अंधश्रद्धा, कर्मकांड यांचे प्राबल्य वाढल्यामुळे खेर ज्ञान लोप पावले. त्या काळास मध्ययुगीन कालखंड असे म्हणतात. जेंव्हा बुद्धी प्रामाण्यवाद चिकित्सेच्या आधारे नव मानवता वादाचा स्वीकार चालू झाला, प्रबोधन सुरु झाले त्यास आधुनिक कालखंड असे म्हणता येते. भारतात जेंव्हा पेशवाईचा नाश झाला. ब्रिटीशांच्या सत्तेचे दृढीकरण झाले तो काळ आधुनिकतेची सुरुवात म्हणून गृहीत धरला जातो.

**साधने म्हणजे काय ?**

इतिहास लेखनात साधनांना खूप महत्त्व आहे. साधने हा इतिहासाचा आत्मा आहे. "ज्या वस्तू, ग्रंथ गतकालीन मानवी जीवनाविषयी कोणत्या ना कोणत्या स्वरुपात माहिती देतात त्यांना साधने असे म्हणतात." "Any mark of past constitutes source of History" साध्यापर्यंत पोहचण्यासाठी साधनांची गरज असते. साधने जेवढी मुबलक तेवढी इतिहास लिहिण्यास मदत होते. ज्या लिखित साहित्याचा व पुरातत्वीय अवशेषाचा आधार घ्यावा लागतो त्यास आपण इतिहासाची साधने म्हणतो. माणसाला जगण्यासाठी जेवढी श्वासाची गरज लागते तेवढीच आवश्यकता इतिहास लेखन करतांना, साधनांची, पुराव्यांची भासते. प्रसिद्ध विचारवंत रँके म्हणतात, "No Document No History" म्हणून साधनांचे इतिहास लेखनात अनन्य साधारण महत्व आहे. त्याशिवाय लिहिलेला इतिहास विश्वासनिय असूच शकत नाही.

साधने भरपूर प्रमाणात विखुरलेली असतात हे अवशेष दगडाचे हत्यारे, दगडाची अवजारे, घरे, मंदीरे, रस्ते, लेणी, स्तूप, स्तंभ, विहार, घराचे चौथरे, किल्ले, विविध वापरातील

वस्तू, नाणी, मुर्ती, खापरे, दगड, गोट्या, धार्मिक ग्रंथ, अधार्मिक ग्रंथ, प्रवास वर्णने, दैनंदीनी, परकीयांची प्रवासवर्णने इ. हीच इतिहासाची साधने होत.

प्राचीन भारतीय इतिहासाची साधने मुख्यत: दोन प्रकारात विभागली जातात. एक पुरातत्त्वीय साधने यालाच अलिखित साधने किंवा भौतिक साधने असे म्हणतात. दुसऱ्या प्रकारच्या साधनाला पुराभिलेखीय साधने असे म्हणतात. पुराभिलेखीय साधने म्हणजेच लिखित साधने. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी दोन्ही प्रकारची साधने विपूल प्रमाणात उपलब्ध झाली आहेत.

**१) वाङ्मयीन किंवा लिखित साधने :**

१) प्राचीन भारतीय साहित्य किंवा वाङ्मय

२) परकीय प्रवाशांची वर्णने

**२) भौतिक, अलिखित किंवा पुरातत्त्वीय साधने :**

**१) वाङ्मयीन किंवा लिखित साधने :**

**१) प्राचीन भारतीय साहित्य किंवा वाङ्मय :-** प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी वाङ्मयीन साधनाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. या साधनामध्ये पहिल्या प्रकारात तत्कालीन धर्माचे विवेचण आहे तर दुसऱ्या प्रकारात धर्मनिरपेक्ष साहित्यात तत्कालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भ आहेत. अभ्यासाच्या दृष्टीने वाङ्मय साधनाचे १) धार्मिक साहित्य आणि २) धर्म निरपेक्ष साहित्य असे दोन भाग करता येतात.

**धार्मिक साहित्य :-** भारत हा धर्मप्रवण देश असल्याने प्राचीन भारतातील लोकांच्या जीवनात प्रत्येक क्षेत्रात धर्माचा पगडा जाणवतो. प्राचीन काळात भारतात अनेक धर्मग्रंथ लिहिले गेले. या ग्रंथात तत्कालीन भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब उमटल्याने ते प्राचीन भारताच्या इतिहासाचे महत्त्वाचे साधन बनले आहे. काही काळानंतर नवनवीन धर्म व संप्रदाय निर्माण झाले. प्रत्येक संप्रदायाने आपले स्वतंत्र धर्मग्रंथ लिहिले. सुरुवातीला केवळ धार्मिक साहित्यावर भर होता. कारण त्या काळात माणसाच्या जीवनात धर्माला अनन्य साधारण महत्त्व होते. त्यामुळेच हे धार्मिक ग्रंथ तत्कालीन जीवनाचा आरसा बनले. तत्कालीन प्रत्येक सांप्रदायाने जरी आपल्या धर्मातील तात्त्विक विचारांची चर्चा केली असली तरी त्यामध्ये तत्कालीन समाजाचे राजकीय व सांस्कृतिक चित्र एक सारखेच होते. प्राचीन काळात तीन प्रमुख सांप्रदाय भारतात होते. वैदिक, बौद्ध आणि जैन त्यामुळे या तीन सांप्रदायाचे धार्मिक साहित्य प्राचीन काळी रचले गेले.

१) वैदिक किंवा ब्राह्मण धार्मिक ग्रंथ

२) बौद्ध धार्मिक ग्रंथ

३) जैन धर्मग्रंथ

**१) वैदिक ग्रंथ :**

वैदिक ग्रंथात चार वेद, ब्राह्मण ग्रंथ, अखके, उपनिषद, वेदांग, स्मृतिग्रंथ, रामायण, महाभारत, आणि पुराणे यांचा समावेश होतो.

**१) वेद :-** वैदिक ग्रंथातील सर्वात प्राचीन व महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे 'वेद' हा शब्द 'विद' या धातूपासून तयार झाला असून त्याचा अर्थ ज्ञान किंवा जाणणे असा होतो. वेद चार आहेत.

**ऋग्वेद :-** हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. ऋग्वेदाची रचना इ.स.पू. १५०० ते इ.स. पू १००० च्या दरम्यान झाली. ऋक् म्हणजे ऋचा, ओळी, पंक्ती, छंद, वेद म्हणजे ज्ञान. ऋग्वेदाची १० मंडले असून १०२८ सुक्त आहेत. ऋग्वेद सुक्ते विभिन्न काळातील विभिन्न ऋषींची आहेत. २ ते ७ मंडले प्राचीनतम असून प्रत्येक मंडल हे ऋषी किंवा त्यांच्या परंपरेतील लोक या सुक्तांचे दृष्टे आहेत. हे ६ ऋषी म्हणजे गृत्समद, विश्वमित्र, वामदेव, आत्री, भारद्वाज आणि वसिष्ट हे होत. आठव्य मंडलात कण्व व अंगीरस या कुळातील सुक्ते आहेत. तर नवव्या मंडलातील सर्व सुक्ते ही सोमदेवाला उद्देशून आहेत. पहिल्या व दहाव्या मंडलात विभिन्न ऋषींची विभिन्न विषयांची सुक्ते आहेत. आर्य लोक सुख, समृद्धी, संपत्ती, संतती, भरपूर पिके, पाऊस, गोधन वृद्धी, दीर्घायुष्य इ.साठी आर्यलोक या सुक्तांच्या माध्यमातून आर्यलोक ईश्वराची प्रार्थना करीत या सुक्तामधून आर्यांचे धार्मिक जीवन, राजकीय जीवन, तत्कालीन संस्कृतीची माहिती मिळते. ऋग्वेद हा पहिला ग्रंथ आहे की ज्यात सृष्टीचा निर्माता, सृष्टी आणि तिचा विकास या संबंधातील रहस्य जाणून घेण्याची मानवाची जिज्ञासा दिसून येते. ऋग्वेद ही अनेक ऋषींची निर्मिती असून प्रत्येक सुक्ताच्या सुरुवातीला त्याच्या रचियेत्याचे नाव व गोत्र देण्यात आले आहे.

**सामवेद :-** यज्ञाच्या वेळी गावयाच्या ऋचांचा संग्रह म्हणजे सामवेद होय. सामवेदाची रचना इ.स.पू. १००० ते इ.स.पू.५०० या दरम्यान झाली. साम म्हणजे गीत सामवेदात १५४९ ऋचा असून त्यातील ७५ मुळ आहेत. बाकी ऋग्वेदातून घेण्यात आल्या आहेत. गाण्याचे राग शिकवणे हा सामवेदाचा मुख्य हेतू आहे.भारतीय संगीत, यज्ञकर्म यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी सामवेदाचा उपयोग होतो. सामवेदाचे आर्चिक आणि उत्तर आर्चिक असे दोन भाग

आहेत. सामवेदाच्या गायकांना उद्‌गाता म्हणतात. सामवेद हे भारतीय संगीताचे स्त्रोत आहे.

**यजुर्वेद :-** यजूर्वेदात यज्ञाची रचना व त्याच्या विधींची माहिती देण्यात आली आहे. यजु + वेद = यजुर्वेद म्हणजे यज्ञ होय. यजुर्वेदाचे दोन भाग आहेत.

अ) कृष्ण यजुर्वेद : यामध्ये यज्ञाची जागा, यज्ञकुंड, त्याची लांबी, रुंदी, त्यासाठी लागणारे साहित्य व विधी याचे वर्णन आहे. कृष्ण यजुर्वेदाच्या कठक, कपिष्ठल, मैत्रायणी आणि तैत्तरीय या चार शाखा आहे.

ब) शुक्ल यजुर्वेद : शुक्ल यजुर्वेदात मंत्र, श्लोक आणि यज्ञसमयी उच्चारावयाच्या वाक्याचा संग्रह आहे. शुक्ल यजुर्वेदाची वाजसनेयी ही शाखा आहे.

जी व्यक्ति यज्ञाच्या वेळी यजुर्वेदातील मंत्राचे उच्चारण करुन देवतांना आवाहन करते त्या व्यक्तीला 'होता' म्हणतात. हा वेद कर्मकांड प्रधान आहे. या वेदाचे साहित्यिक आणि धार्मिक महत्त्व असून यात गद्य लेखनाचे प्रारंभिक रुप दिसून येते. यात आर्यांचा भौगोलिक विस्तार तसेच धार्मिक आणि सामाजिक माहिती मिळते.

**अथर्ववेद :-** अथर्ववेद हा तिन्ही वेदापेक्षा वेगळा असून यामध्ये ४० अध्याय, ७३१ सुक्त आणि ६००० मंत्र आहेत. अथर्व ऋषीद्वारे या वेदाची रचना झाली आहे. म्हणून याला अथर्ववेद म्हणतात या वेदात धर्म, समाज रचना, औषधी, विज्ञान, जादूटोना, अंधश्रद्धा, रोग निवारण, तंत्रविद्या इ. ची सविस्तर चर्चा आहे. तसेच अर्थशास्त्राचा आरंभ अथर्ववेदातून होतो. तसेच यातील काही सुक्तातुन तत्वज्ञानाची चाहून लागते. एकंदरीत तत्कालीन समाज जीवन, प्रथा, आर्य-अनार्य संघर्ष विविध शास्त्रांची उत्पत्ती इ. माहिती अथर्ववेदातून मिळते.

**२) ब्राह्मण ग्रंथ :**

वैदिक साहित्यात ब्राह्मण ग्रंथाना अनन्य साधारण महत्त्व आहे. सुरुवातेला सरळ व साधा वाटणारा वैदिक धर्म जटील बनला. कर्मकांडाना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. त्यातील सरळ व साधेपणा नाहीसा झाला. समाजात अंध:विश्वास व अवडंबर माजले. तेंव्हा वेदाचा अर्थ सरळ व सोप्या भाषेत सांगण्यासाठी कर्मकांडाचे सोप्या भाषेत विवेचन करण्यात आले. ते सर्वांना सहज समजावेत म्हणून ब्राह्मण ग्रंथाची रचना करण्यात आली. चातूर्वण्यपद्धती व प्रत्येक वर्णाचे हक्क, कर्तव्य, मर्यादा निश्चित करण्यात आल्या. ब्राह्मणग्रंथ म्हणजे ऋषीनी केलेले वेदावरचे भाष्य होय. तत्कालीन धर्म, सांस्कृतिक प्रगती, यज्ञ संस्थेची श्रेष्ठता, यज्ञ संस्थेचे महत्त्व, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान इ. ची माहिती मिळते. प्रत्येक वेदाचे वेगवेगळे ब्राह्मणग्रंथ आहे.

| | | |
|---|---|---|
| ऋग्वेदाचे | - | ऐतरेय आणि कौषितकी |
| सामवेदाचे | - | पंचविष, सदाविष, जैमिनीय आणि छांदोग्य |
| कृष्णयजुर्वेदाचे | - | तैत्तिरीय |
| शुक्लयजुर्वेदाचे | - | शतपथ |
| अर्थवेदाचे | - | गोपथ |

ब्राह्मण ग्रंथातून धर्माचे वास्तव रुप सांगितले आहे. त्याचबरोबर त्यातून तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनाचीही माहिती मिळते.

**३) आरण्यके :**

याला ब्राह्मण ग्रंथाचा उत्तर भाग समजण्यात येतो. ब्राह्मण ग्रंथानंतर या ग्रंथाचे महत्त्व आहे. यामध्ये वेदातील गुढ तत्त्वज्ञानाचे विवेचन करण्यात आले आहे. वानप्रस्त आश्रमात असतांना यज्ञ विधीचे पालण करणे कठीन असे. त्यामुळे ऋषीमुनी आपला जास्तीत जास्त वेळ ध्यान धारणा, मनन, चिंतन यात घालवत. हे तत्त्व चिंतन एकांतवासात, अरण्यात करावयाचे असल्याने या चिंतनातून जे साहित्य निर्माण झाले त्यास 'अरण्यके' असे म्हणतात. शिष्याने अरण्यात जाऊन ही विद्या प्राप्त करावयाची अशी या ग्रंथाची अपेक्षा आहे. म्हणून अरण्यकांना महत्त्व आहे. म्हणून याला वेदाचे उपांग म्हणतात. यामध्ये ऐतरेय, तैत्तीरीय आणि कौषितकी अरण्यक प्रमुख आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी हे ग्रंथ उपयुक्त आहेत.

**४) उपनिषदे :**

उपनिषदे म्हणजे गुढ ज्ञानाच्या शिक्षणासाठी शिष्याने गुरुजवळ बसणे हा उपनिषदाचा अर्थ आहे. उपनिषदे हा शब्द उप + नि + षद् या शब्दांचा मिळून बनला आहे. हा तत्वज्ञावरचा ग्रंथ असून यात आत्मा, ब्रह्म, प्रकृति यांचे विवेचन करण्यात आले आहे. उपनिषदांच्या संख्येबद्दल मतभेद आहेत. वेबरच्या मते एकूण उपनिषदे २३५ आहेत. भुक्तिकोपनिषदात १०८ उपनिषदे असल्याचा उल्लेख आहे. यात एतरेय, कोषितकी, छांदोग्य, केन, कढ, तैत्तिरिय, इश, मुण्डक, माण्डूवय्, प्रश्न ही दहा उपनिषदे महत्त्वाची व जुळी मानली जातात. जीव व विश्व यांचे अंतिम स्वरुप मोक्ष प्राप्तीचा मार्ग या विषयीची चर्चा त्यामध्ये केलेली आहे. भक्ती, तप, संन्यास, आत्म्याचे विविध योनीतील भ्रमण पूर्वजन्म सिद्धान्त इ. चे विवरण आहे. उपनिषदांची भाषा साधी सुबोध आहे. जर्मन तत्वज्ञ, शोपोन हॉवर म्हणतो, "उपनिषदे माझ्या जीवनाची शांती आहे व मृत्यू समयी ही उपनिषदे मला शांती देतील.

**५) वेदांगे :**

वेदांगे ही सहा आहेत. शिक्षा, कल्प, निरुक्त, व्याकरण, जोतिष, छंद, वेदांगे ही वेदाची पुरक शास्त्रे आहेत. वेदांगे वेदाच्या आभ्यासाला अंगभूत असल्याने त्यास वेदांगे म्हणतात.

१) शिक्षा - यात वेदांच्या स्पष्ट व शुद्ध उच्चाराचे नियम दिले आहेत.

२) कल्प - यात यज्ञविषयक विधि व नियम आहेत. कल्पसुत्राचे चार भाग आहेत.

१) श्रोतसुत्रे : यात यज्ञाचे नियम आहेत हा विधी खर्चिक असल्याने याचा उपयोग फक्त श्रीमंत लोकातच होई.

२) गृहसुत्रे :यात गृहस्थाने लहान प्रमाणात घरात करावयाची यज्ञाचे नियम दिले आहेत.

३) धर्मसुत्रे : वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात पाळावयाचे नीतिनियम यात आहेत.

४) शुल्बसुत्रे : यात यज्ञविधीचे प्रकार व रचना आहेत.

३) व्याकरण - यात संस्कृत भाषेच्या व्याकरणाची चर्चा करण्यात आली आहे. पानिणीचा 'अष्टध्यायी' हा इ.स.पू. ५ व्या शतकात लिहिण्यात आलेला ग्रंथ आहे.

४) निरुक्त - यात वैदिक शब्दांची उत्पत्ती कशी झाली, शब्दांचे धातू, त्यांचे अर्थ या विषयी चर्चा करण्यात आली आहे.

५) छंदशास्त्र - यात वैदिकमंत्र तालासुरावर म्हटले तरच इच्छित फलप्राप्ती होते. कोणत्या इच्छापूर्तीसाठी कोणते मंत्र तालासुरावर म्हणावयाचे ते यात सांगितले आहे.

६) जोतिषशास्त्र : लगधमुनि जोतिषशास्त्राचे प्राचीनतम् मुनी मानले जातात. नारद संहितेत जोतिषशास्त्राचा विकास करणाऱ्या १८ जोतिषाचार्याचा उल्ले आहे. ज्यात आर्यभट्ट, लल, वराहमिहीर, ब्रह्मगुप्त, मुंजाल, भास्कराचार्य इ. नावे प्रमुख आहेत. जोतिषशास्त्रात यज्ञ करण्याची योग्य वेळ कोणती तसेच महिने व वर्ष, चंद्र-सुर्य यांची गती याचीही चर्चा केली आहे.

**६) षड्दर्शन :**

वेदांगाबरोबरच षड्दर्शनाचाही समावेश वैदिक साहित्यात केला जातो. दर्शने सहा आहेत.

१) न्याय दर्शन : याचा रचीयता गौतम आहे.

२) वैशांषिक दर्शन : याचा रचीयता कणाद आहे.

३) सांख्य दर्शन : याचा रचीयता कपिला मुनी आहे.

४) योग दर्शन : याचा रचीयता पतंजली आहे

५) पूर्वमीमांसा दर्शन : याचा रचीयता जैमिनी आहे

६) उत्तर मीमांसा दर्शन : याचा रचीयता बादरायण आहे

**७) स्मृतिग्रंथ :**

स्मृती या शब्दाचा अर्थ आढळलेली माहिती. स्मृती ग्रंथास दुसरे नाव म्हणजे 'धर्मशास्त्र' हे होय. हिंदू कायद्याचे प्राचीन ग्रंथ म्हणून स्मृतीग्रंथाचे महत्त्व खूप मोठे आहे. स्मृती म्हणजे स्मरण. संस्कारामुळे निर्माण झालेले ज्ञान म्हणजे स्मृती अशी स्मृतीची ढोबळ व्याख्या करता येते.

१) मनुस्मृती : मनुस्मृतीचे लिखाण केंव्हा झाले हे नक्की सांगता येत नाही. सर विल्यम जोन्स यांच्या मते इ.स.पू. १२०० मध्ये, एल्फीस्टनच्या मते इ.स.पू. ९०० मध्ये, प.वा.काणे यांच्या मते इ.स. २०० च्या सुमारास लिहिली असावी. मनुस्मृतीत १२ अध्याय असून २६८४ श्लोक आहेत. या ग्रंथात पौराणीक वेदांतविषयक तसेच सांख्य विचारांची चर्चा आहे. त्याचबरोबर नीतिपूर्वक आणि धर्माला अनुसरून असे लिखान आहे. या ग्रंथात मनुने ब्राह्मण व ब्राह्मणाची बाजू मांडली आहे. ब्राह्मणांचे हक्क, अधिकार व समाजातील त्यांचे श्रेष्ठत्त्व याबद्दल तो आग्रहाने मते मांडतो. ब्राह्मण हा भ्रष्ट, अपवित्र असला तरी तो पुज्यच आहे असे तो म्हणतो. मनुने राज्यातील न्यायव्यवस्था, गुन्ह्याचे व शिक्षेचे स्वरुपही मांडले. या ग्रंथात तो स्त्रीयांचे स्वातंत्र्य, विधवांची कर्तव्य, जातीसंस्थेची निर्मिती, वर्णाश्रम धर्म, पती-पत्नीची कर्तव्य, विवाह विधी, राजा व प्रजा यांच्यातील संबंध इत्यादीची माहिती आहे.

२) विष्णुस्मृती : बराचसा भाग मनुस्मृतीतील हा विष्णुस्मृतीत सांगितलेला आहे. विवाहासंबंधीची माहिती तसेच कोणत्या वस्तूवर किती कर लावायचे याचाही उल्लेख या स्मृतीत आहे. न्याय शासना बाबतचे तपशीलवर विवेचन विष्णुस्मृतीत आहे. विष्णूस्मृतीत प्रायश्चितही सांगितली आहेत. तसेच दान धर्माचाही यात समावेश आहे.

३) नारदस्मृती : यामध्ये न्यायविषय साक्षी, पुरावे, शिक्षा तसेच सामाजिक समस्याचा विचार करण्यात आला आहे. नारदस्मृती व मनुस्मृतीत काही बाबतीत तफावत आहे. विधवा विवाहास मनुने मान्यता दिली नाही. तर नारदस्मृतीने पूर्नविवाहास मान्यता दिली. नारद स्मृतीने विधवेला तिच्या पतीच्या संपत्तीत वारसा हक्क दिला आहे. तर मनुने तो नाकारला आहे. नारद स्मृतीत व्यावसायिकांच्या संघटनांचा उल्लेख आहे.

४) पाराशरस्मृती : या स्मृतीग्रंथतात प्रत्येक वर्णीयाने करावयाचा व्यवसाय, कर वसुलीचे नियम, प्रायश्चिते, राजाची कर्तव्य इ. माहिती मिळते.

५) ब्रहस्पतीस्मृती : या स्मृतीमध्ये न्यायशासन व कायद्याचा तपशिलवार विचार

मांडलेला आहे. न्यायालयाची रचना, न्याय मंडळाच्या सदस्याचे वर्गीकरण, न्याय मंडळाची कार्य, शपथा, दिव्य इ. ब्रहस्पतीने फार चांगल्या पद्धतीने न्याय व्यवस्थेचे विवेचन केलेले आपल्याला पाहायला मिळते. धर्म, व्यवहार, चारित्र्य व राजाज्ञा हे न्यायाचे चार आधार तो सांगतो. वित्तीय प्रकाशन, परराष्ट्र धोरण याबाबतही त्याने विचार मांडले आहेत.

६) याज्ञवलक्य स्मृती : याज्ञवलक्य हा मनुपेक्षा प्रगत विचारांचा आहे. याज्ञवलक्यस्मृतीचे आचाराध्याय, व्यावहाराध्याय व प्रायश्चिताध्याय हे तीन आध्याय आहेत. याज्ञवलक्यांने शरीरशास्त्र विषयक व औषधी विषयक माहिती दिली आहे. 'विज्ञानेश्वराची मिताक्षरा' हा या स्मृतीग्रंथावरचा टिकाग्रंथ आहे. स्वातंत्र्यापुर्वीच्या भारतात ब्रिटीशांच्या काळातील न्यायालये मिताक्षरायुक्त ज्ञानवलक्यस्मृतीच्या आधारे हिंदू दिवाणी दाव्यात न्याय निवाडे देत. याज्ञवलक्यस्मृतीत १००० श्लोक आहेत. या स्मृतीग्रंथात राजनिती, न्यायदान, परराष्ट्रसंबंध, गुन्हे व शिक्षा यांचे स्वरुप, आर्थिक दंडाचे प्रकार, वारसाहक्क व विवाहासंबंधीचे नियम दिले आहेत.

**८) महाकाव्य :**

रामायण व महाभारत ही दोन महाकाव्ये भारतीय साहित्य परंपरेतील मुकूट मणी आहेत. रामायण व महाभारत ही दिर्घ महाकाव्य आहेत. दीर्घ काव्याला महाकाव्य म्हणतात. यामध्ये त्याकाळातील सामाजिक आदर्श, राजनीती, युद्ध, तह, व्यापार, राज्यपद्धती, समाजातील आचार-विचार पद्धती, स्त्रीयांचा दर्जा इ. माहिती मिळते. तसेच ती भारतीय संस्कृतीची प्रतिके आहेत.

१) रामायण - इ.स.पू. ५०० ते इ.स.पू. २०० या दरम्यान रामायण या महाकाव्याची रचना झाली असावी. रामायण या आदिकाव्याची रचना महर्षी वाल्मिकीने केली असून यात ७ कांड व २४,००० श्लोक आहेत. या ग्रंथात आदर्शकाव्य शैलीबरोबरच मानवी जीवनातील उच्च आदर्शाचे आणि नैतिकतेचे चित्रण करण्यात आले आहे. आर्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, न्याय, नीती यांची माहिती आपणास रामायण या महाकाव्यातून मिळते.

२) महाभारत : महाभारत हे महर्षी व्यासानी लिहिलेले महाकाव्य आहे. १८ खंडातील या काव्याची मुळकथा ही कौरव-पांडवाच्या युद्धाची असून काळानुसार त्यात अनेक वीरगाथा, नीती व धर्म कथा जोडल्या गेल्याने एक लक्ष श्लोकाचा या ग्रंथाने विश्वकोषाचे रुप धारण केले आहे. महाभारताला पाचवा वेद देखील म्हणतात. ही एका व्यक्तीची कलाकृती नसून इ.स.पू. १० व्या ते इ.स.पू. २ ऱ्या शतकाच्या कालखंडात यात अनेक विद्वानांनी आपापल्या

परीने भर घातली आहे. महाभारतातून त्या काळातील राजकारण, समाजजीवन, स्त्रीयांचा दर्जा, विवाह पद्धती, युद्ध पद्धती, कुटनीती, समाजाचा नैतिक दर्जा इ. गोष्टीची आपल्याला माहिती मिळते.

**९) भगवद्गीता :**

गीतेचे धार्मिक व तत्त्वज्ञान विषयक महत्त्व अमुल्य आहे. गीता ही महाभारतातील भीष्मपर्वाचा एक भाग आहे. कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेल्या गीतेत रक्ताची नाती आणि कर्तव्य यांच्या संघर्षात कर्तव्याला महत्त्व देण्यात आले आहे. गीतेत संसार व शरीर हे नश्वर असून आत्मा अमर आहे म्हणून निष्काम कर्मांची प्रेरणा देण्यात आली आहे. संसारात राहूनही कर्म निष्काम भावनेने केल्यास मनुष्याला मोक्षप्राप्त होऊ शकते. गीता म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

**१०) पुराणे** :

पुराणांची रचना नेमकी कोणत्या काळात झाली याविषयी विद्वानात मतभिन्नता आहे. सामान्यतः याचा रचनाकाळ हा इ.स.पू. चौथे शतक मानन्यात आला आहे. 'पुराणाचा' अर्थ भुतकाळ असा मानला जातो. भुतकाळातील घटकांचे वर्णन यांचा संबंध इतिहास लिहिण्यासाठी पुराणाचा फार उपयोग होतो. पुराणे म्हणजे पाच अंगाचे विवेचन करणारे आहेत. सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर व वंशानुचरीत मुख्य पुराणे १८ आहेत यात ब्रह्म, पद्म, वायू, विष्णू, भागवत, नारद, मार्कण्ड, अग्नी, भविष्य, लिंग, वराह, स्कंद, वामन, कुर्म, मत्स्य, गरुड, ब्रह्मांड व ब्रह्मवर्त याशिवाय १८ उपपुराणे आहेत. पुराणांचे सात्विक, राजस व तामस असे तीन गट केले जातात.

१) सात्विक (मोक्षदायी) - विष्णु, नारदीय, भागवत, गरुड, पद्म व वराह

२) राजस (स्वर्गदायी) - ब्रम्हांड, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, भविष्य, वामन व ब्रह्म

३) तामस (नरकदायी) - मत्स, कुर्म, लिंग, स्कंद, अग्नी व वायू

प्राचीन भारताच्या इतिहासाच्या दृष्टीने पुराणांना बरेच महत्त्व आहे. भारताची तत्कालीन भौगोलिक परिस्थिती, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकतात. विष्णू, वायू, ब्रम्हांड, मत्स, भागवत या पुराणात भगवान कृष्ण व इतर देवतांची तसेच अनेक राजवंशाची माहिती आहे. नंद, मौर्य, शुंग, कण्व, सातवहान इ. राजवंश्याच्या नोंदी पुराणात आहेत. हिंदू देवदेवता मोक्षप्राप्ती, समाजाचा परमेश्वराबद्दलच्या कल्पना, भक्तीमार्ग, जातीसंस्था, वर्णाश्रम, हिंदूची तीर्थक्षेत्रे, विधवांचा आचार धर्म इ. माहिती पूराण

ग्रंथात आहे. भक्ती, सदाचार, श्रद्धा, नीती इ. तत्त्वांचे शिक्षण पुराणात आहे. मार्कंडेय पुराणात गुप्तवंशीय राजाच्या काळाचे सांस्कृतिक वर्णन आहे. अग्निपुराणात गौतमबुद्धाचा वृतांत आहे. स्कंदपूराण सर्वात मोठे असून त्यात भौगोलिक माहिती आहे. व्ही.ए. स्मिथ या इतिहासकाराने The Early History of India या ग्रंथात म्हटले आहे की, "भारतीय ऐतिहासिक परंपरेचा अत्यंत पद्धतशीर वृत्तांत पुराणाच्या वंशवळी याद्यात लिहून ठेवला आहे."

**११) बौद्ध धर्म साहित्य :**

प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी बौद्ध धर्म व तत्त्वज्ञानाचे ग्रंथ विपूल प्रमाणात उपलब्ध आहेत. प्राचीन भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी बौद्ध धर्म ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. या बौद्ध साहित्यात त्रिपिटक, दिपवंश, महावंश, महावस्तू, ललितविस्तार, बुद्धचरित्र, मिलिंदपन्हो, सौदरानंद, आवदान साहित्य इ. ग्रंथ महत्त्वपूर्ण आहेत.

१) त्रिपिटक : त्रिपिटकामधून गौतम बुद्धाच्या धार्मिक उपदेशाची माहिती जाणून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन आहे. त्रिपिटक हे तीन आहेत. विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपिटक.

१) विनयपिटक : विनयपिटकात बौद्ध भिक्षू-भिक्षूणीसंघ, त्यांचे दैनंदिन आचारासंबंधीचे नियम, आचार-विचार इ.चे संकलन करण्यात आले आहे. त्रिपिटकात विनयपिटक हे सर्वात महत्त्वाचे मानले जातात. विनयपिटकाचे परत तीन भाग आहेत.

१) सुत्तविभाग - याचे महाविभंग आणि भिक्षुणीविभंग असे दोन भाग आहेत.

२) खंदका - याचे महावग्ग आणि चूलवग्ग असे दोन भाग आहेत.

३) परिवार किंवा परिवार पाठ :'

२) सुत्तपिटक : सुत्तपिटकामध्ये धर्माविषयीच्या उपदेशांचा संग्रह करण्यात आला आहे. यात बौद्ध धर्माची रुपरेषा स्पष्ट करुन सांगण्यात आली आहे. सुत्त म्हणजे धर्माख्यान होय. सुत्तपिटकाचे पाच निकाय संग्रह आहेत.

१) दिर्घनिकाय - हा ग्रंथ गद्य-पद्य मिश्रित आहे. यामध्ये बौद्ध धर्मातील निरनिराळ्या मतांची चर्चा व त्याचे खंडन करण्यात आले आहे. याचे प्रमुख सुत्त 'महापरिनिब्बान सुत्त' असून यात गौतम बुद्धाच्या जीवनाच्या अंतिम काळातील कथेचे वर्णन करण्यात आले आहे.

२) मज्झिमनिकाय - यात बौद्ध धर्माच्या निरनिराळ्या तत्वज्ञानावर व्याख्याने, कथा आणि संवाद देण्यात आले आहेत. यात कधी बुद्धाला मानवी रुपात तर कधी दिव्यशक्तीच्या

रुपात चित्रित करण्यात आले आहे.

३) संयुवत्तनिकाय - संयुक्तनिकायमध्ये एकाच विषयावर अनेक सुक्त असल्याने त्याला संयुक्तनिकाय असे म्हटले आहे. यात महात्मा गौतम बुद्धाच्या जीवनातील घटनांचे वर्णन आहे. तसेच काही देवी-देवतांच्या कथा आहेत. यात काही ठिकाणी बौद्ध मतांचे समर्थन तर काही ठिकाणी खंडण करण्यात आले आहे.

४) अंगुत्तरनिकाय - या संग्रहात बोधपर वचने असून ती संख्येच्या चढत्याक्रमाने लावली आहेत. उदा.तिसऱ्या प्रकरणात क्रिया वाचा व विचार ही त्रयी, भिक्षुंचे तीन वर्ग देवाचे तीन दुत, मृत्युच्या सर्वस्पर्शी-सर्वव्यापी शक्तीची तीन कारणे, मौनांचे तीन प्रकार, स्त्रीयाच्या नरकगमनाची तीन कारणे, संयुक्त निकायातील सुत्राप्रमाणे या निकायातील सुत्रेही लहान भाषणांच्या व संवादाच्या रुपात आहेत.

५) खुद्दकनिकाय : हा लघूग्रंथांचा संग्रह होय. खुद्दपाठ, धम्मपद, उदान, इतिवूत्तक, सूत्तनिवात, विमानवत्थू, पेथवत्थू, थेरीगंगा, जातक इ. ग्रंथ याची निरनिराळी अंगे किंवा भाग आहेत. यात बौद्धधर्माची शिकवण, गौतम बुद्धाचे जीवन तसेच बौद्ध धर्माच्या लोकप्रियतेची माहिती मिळते.

३) अभिधम्मपिटक : अभिधम्मपिटकामध्ये बौद्ध धर्माच्या तत्वज्ञाची चर्चा करण्यात आली आहे. याचे धम्मसंगिणी, विभंग, धातूकला, पूगलपज्जती आणि कथावस्थू हे भाग असून त्यात कथावत्थू सर्वात महत्त्वपूर्ण आहे. मोग्गलिपूत्र तिस्सने तृतीय बौद्ध धर्मपरिषदेच्यावेळी या ग्रंथाचे संकलन केले. यात खालील ग्रंथ मोडतात.

१) दविवंश - यात सिंहलद्वीप (श्रीलंका) च्या इतिहासाची माहिती आहे. या ग्रंथाची रचना इ.स. चौथ्या-पाचव्यां शतकात झाली.

२) महावंश - महावंश या ग्रंथात चंद्रगुप्त मोर्याच्या प्रशासनाची माहिती मिळते. इ.स.पाचव्या शतकात महानाम कवीने या ग्रंथाची रचना केली.

३) महावस्तू - महावस्तूमध्ये गौतम बुद्धाचे जीवन चरित्राचे वर्णन करण्यात आले आहे. यात समिश्र संस्कृत भाषेचा प्रयोग करण्यात आला आहे. हा ग्रंथ हीनयान संप्रदायाचा असला तरी यात महायान संप्रदायाची वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत.

४) ललितविस्तार - यात गौतमबुद्धाच्या लौकीक जीवनातील लीलांचे वर्णन असून गौतम बुद्धाला दिव्यशक्तीच्या रुपात प्रस्तूत करण्यात आले आहे.

५) बुद्धचरित्र - बुद्धचरित्राचे लेखक अश्वघोष आहे. हा ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. साहित्तीक

व ऐतिहासिक दृष्ट्या हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे.

६) सौदरानंद - अश्वघोषाने या महाकाव्याची रचना केली आहे. हा ग्रंथ देखील संस्कृत भाषेत आहे. यामध्ये बुद्धाचे जीवन तसेच बौद्ध धर्माच्या तत्त्वांची चर्चा करण्यात आली आहे.

७) अवदान साहित्य - हा ग्रंथ एकाच वेळी एका व्यक्तीने लिहिलेला नसून यामध्ये अशोक ते पुष्यमित्र शुंग या दरम्यानच्या शासकाचे वर्णन आहे. जे इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. बौद्ध साहित्यातील हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे.

८) मिलिंदपन्हो - मिनॅंडरचा काळ ठरविण्यासाठी हा ग्रंथ अतिशय मोलाचा आहे. ग्रीक राजा मिनॅंडर (मिलिंद) आणि बौद्ध भिक्षू नागसेन यांच्यातील धार्मिक संवाद प्रश्नोत्तराच्या रुपाने यात प्रस्तूत करण्यात आला आहे.

४) धम्मपद : सर्व बौद्ध ग्रंथाचा अर्क किंवा गाभा म्हणजे धम्मपद होय. धम्मपदात एकूण २६ वर्ग असून ४२३ वचने आहेत. प्रत्येक वचन बुद्धाच्या तोंडून बाहेर पडले असे बौद्धधर्मिय मानतात. धम्मपद या ग्रंथात बुद्धाचे तत्त्वज्ञान, नितीपर शिकवण व जागतिक व्यवहारात आढळून येणारी चिरंतन तत्त्वे (Universal Truths) आहेत. बौद्ध धर्मातील हिनयान पंथीय लोक हा ग्रंथ नित्य पाठांतराचा ग्रंथ मानतात. बौद्ध संप्रदायाच्या नीतितत्त्वविषयक सुभाषितांचा हा संग्रह आहे.

**१२) जैन धर्म साहित्य :**

जैन धर्माचे साहित्य अनेक भाषेमध्ये उपलब्ध आहे. संस्कृत, कन्नड, अर्धमागधी, प्राकृत, तामिळी अशा अनेक भाषेत जैन धर्माचे साहित्य उपलब्ध आहे. जैन आचार्य व कवी यांनी विपूल साहित्य निर्माण केले आहे. अनेक जैन आचार्यांनी आपल्या जीवनाचा बराचसा भाग साहित्य सेवेत व्यतीत केला आहे. त्यामुळे धर्म, दर्शन, न्याय, व्याकरण, काव्य, नाटक, कथा, रास, शिल्प, वस्तू, वैद्यक, राजनीती इ. विषयावर प्रचंड प्रमाणात जैन साहित्य निर्माण झाले आहे. दिगंबर व श्वेतांबर या दोन्ही पंथाचे लोक धर्म ग्रंथाना आगम किंवा सिद्धांत असे म्हणतात.

आगम - जैन ग्रंथात आगम ग्रंथ सर्वात महत्त्वाचे आहेत.

१) बारा अंगे

२) बारा उपांगे

३) दहा प्रकीर्णे

४) सहा छेदसूत्र

भारताविषयी लिहिले आहे. तो महान जोतिषी व गणिततज्ञ होता. तो महमद गझनीच्या वेळी भारतात आला. त्याने 'तहसीमाने हिंद' (तहकिके हिंद) या पुस्तकात भारताच्या सामाजिक व धार्मिक परस्थितीची माहिती दिली आहे. इ.स. १० व्या व ११ व्या शतकाचा भारताच्या इतिहास जाणून घेण्यासाठी त्याच्या ग्रंथाचा उपयोग होतो. त्यामध्ये हिंदूचे सण, परंपरा, विज्ञान यांची उपयुक्त माहिती मिळते.

अलेबरुनीशिवाय अलविलाहूल, हसन निझामी, सुलेमान अलमसुदी, फरिश्ता, निजामुद्दीन, इब्न बतुता इ. मुसलमानी लेखक भारताच्या इतिहासाची पर्याप्त माहिती देतात.

**इटालियन लेखक :**

तेराव्या शतकात इटालीतील व्हेनिसचा रहिवासी मार्कोपोलो हा दक्षिण भारताच्या यात्रेवर आला. त्याने केलेल्या लिखानावरुन तत्कालीन भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीची आपणास माहिती मिळते.

**पुरातत्वीय किंवा भौतिक साधने :**

इतिहासकारांना इतिहास लिहिताना लिखित साधनापेक्षा जास्त भौतिक साधनांचा उपयोग होतो. भौतिक साधनाच्या आधारे वास्तव इतिहास लिहणे सोपे जाते. लिखित साधनातील सत्यता बऱ्याच वेळी भौतिक साधनाच्या आधारे तपासली जाते. म्हणून भौतिक साधनांना प्राचीन भारताच्या इतिहासात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. भौतिक साधने ही उत्खनन अवशेष, अभिलेख, स्मारक, मुद्रा किंवा नाणी इ. स्वरुपात असतात.

**१) उत्खनन अवशेष :**

भारतातील पुराणवस्तू संशोधन केंद्राने देशाच्या अनेक भागात उत्खनन केलेले आहे. हाडाप्पा, मोहेंजोदारो (मोहंजोदडो) नालंदा, तक्षशिला, कपिलवस्तू, नागार्जून कोंडा, कंधार, पैठण, तेर नेवासा, भोकरदन इ. ठिकाणी उत्खनन करण्यात आले आहे. १९२१ मध्ये पुराणवस्तू संशोधन खात्याने मोहंजोदारो व हराप्पा येथे उत्खन केले. त्या उत्खनानत सिंधू संस्कृतीचा शोध लागला. या उत्खननात सार्वजनिक स्नानगृह, धान्य कोठारे, सार्वजनिक इमारती, घरे, रस्ते, भांडी, हत्यारे, हाडे, दगड, काच, मातीची खापरे, खेळणी, अलंकार, प्राण्यांचे शिक्के, सौंदर्य प्रसादनाच्या वस्तू, करमणुकीची साधने इ. अवशेष सापडले. या वस्तूंच्या अवशेषावरुन सिंधू संस्कृतीतील लोकांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवनाची माहिती मिळते. याच संस्कृतीचे अवशेष पंजाबमध्ये रुपड, गुजरातमध्ये रंगपूर, लोथल, प्रभासट्टम, राजस्थानात कालिबंगन येथे सापडले. प्राचीन वस्तुचा कालखंड ठरवण्यासाठी

उत्खननात सापडलेले प्राण्याची हाडे किंवा मानव प्राण्यांची हाडे यावर कार्बन १४ वे रेडीओ कार्बन या कालमापन पद्धतीचा उपयोग करुन काळ ठरवला जातो. प्राचीन वस्तूचे जतन हे देशाच्या विविध ठिकाणच्या पूराणवस्तू संग्राहलयात केले जाते. मुंबई येथे 'प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझीयम', हैद्राबादला 'सालारजंग म्यूझीयम', पूण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये पुरातत्त्व संग्रहालय आहे. तेर, पैठण तसेच डॉ.बा.आ.मराठवाडा विद्यापीठाच्या परिसरातही संग्रालय आहे.

**२) मातीची खापरे :**

कोणत्याही प्राचीन स्थळांच्या उत्खननात खापरे मोठ्या प्रमाणात मिळतात. मातीची भाजून तयार केलेली खापरे हजारो वर्ष जशास तशीच राहतात. त्यावरचे नक्षीकाम व रंगकामही व्यवस्थित टिकून राहाते. मातीच्या खापरावरुन मातीचा प्रकार हवामान, त्या काळातील धान्यप्राप्ती, तंत्रज्ञान, कला कौशल्य, धार्मिक समजुती इ.ची माहिती मिळते. महाराष्ट्रात इनामगाव-दायमाबाद येथे मातीची खापरे मोठ्या प्रमाणात सापडली आहेत. खापरांची पुरातत्त्वीय चिकित्सा करण्याचे शास्त्र खुपच विकसीत झाले आहे.

**३) अभिलेख :**

अभिलेखाचे विश्वसनीय साधन म्हणून प्राचीन भारताचा इतिहास लिहिण्यासाठी उपयोग केला जातो. अभिलेख लिहिण्याची परंपरा खऱ्या अर्थाने सम्राट अशोकापासून सुरु झाली. आतापर्यंत उपलब्ध झालेल्या अभिलेखावरुन राजांच्या वंशावळी, तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते. प्राचीन भारतीय अभिलेख हे शिळा, गुहा, मुर्ती, स्तंभ, ताम्रपत्र, मंदिर, भांडी, मुद्रा इ.वर कोरले गेले आहेत. या लेखांचा मुख्य विषय शासन कर्त्यांचे विजय, कीर्ती, दानशुरता, उत्सव आयोजन आणि ज्यांनी केलेल्या सर्व चांगल्या कार्याचे वर्णन करणे हा असे.

**४) शिलालेख :**

पर्वतीय प्रदेशात शिलालेख खोदले गेले आहेत. यामध्ये शिळा वेगवेगळ्या करुन त्यांना गुळगुळीत मऊ बनवून त्यावर शिलालेख कोरले जात असे. शिलालेख देशाच्या वेगवेगळ्या भागात आढळून आले आहेत. अशोकाचे १४ शिलालेख महत्त्वपूर्ण आहेत. जे शहाबादगढी (पेशावर जिल्हा), मानसेरा (हजारा जिल्हा), कळसी (डेहराडून जवळ), गिरनार (जुनागढ़जवळ), सोपारा (ठाणे जिल्हा), धौली (पुरी जिल्हा), जौनगढ (गंजम जिल्हा), इरागुडी (कर्नुल जिल्हा) या ठिकाणी मिळतात. हे शिलालेख इ.स.पू. २५७ ते इ.स.पू.२५६ या कालाखंडातील असून यातून अशोकाचा नैतिक आणि राजकीय जीवनाची माहिती मिळते. अशोकाचे काही लघू शिलालेख बैसव जिल्हा, सिध्दपूर, जंटिक रामेश्वर, ब्रह्मगिरी येथे

आढळून आले आहेत. या अभिलेखावरुन अशोक बौद्ध संघात सामील झाला होता असे दिसून येते.

मास्की येथे सापडलेल्या अभिलेखेमुळे 'प्रियदर्शी' नावाने लिहिलेले सर्व अभिलेख हे अशोकाचेच आहेत हे प्रथमच कळते. कारण प्रियदर्शीबरोबरच 'अशोकस' शब्दांचाही उल्लेख येतो. रुद्रदामनचा जुनागढ अभिलेख, स्कंदगुप्तचा जुनागढ अभिलेख आणि पुण्यमित्र शुंगाचा अयोध्या अभिलेख यातून त्या त्या शासनाची माहिती मिळते.

**५) स्तंभलेख :**

स्थापत्य कलेत स्तंभाचा उपयोग भारतात खूप जुना असला तरी स्तंभावर लेख लिहिण्याची परंपरा सम्राट अशोकापासून सुरु झाली. अशोकाचे स्तंभलेख इ.स.पू. २४४ ते इ.स.पू. २४३ या काळात लिहिले गेले. हे स्तंभलेख दिल्ली, अलाहाबाद, लौरिया, अरराज, लौरिया नंदगढ तथा रामपूदवा येथून प्राप्त झाले आहेत. या लेखावरुन अशोक बौद्ध धर्मानुयायी तथा बौद्ध धर्माचा रक्षक होता हे दिसून येते. या लेखात सम्राट अशोक बौद्ध संघात फुट फाडणाऱ्यांना बहिष्कृत करण्याचे आवाहन करतो. नेपाळच्या तराई प्रदेशात रुमनदेई तथा निगलोवा येथे स्तंभ लेख सापडले आणि त्याने केलेल्या बौद्ध तीर्थ क्षेत्रांच्या यात्रांची माहिती मिळते. सांची व सारनाथ येथे मिळालेल्या स्तंभलेखावरुन अशोकाने बौद्ध धर्मात उत्पन्न झालेल्या मतभेदाना दुर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळते. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील प्रशस्ती स्तंभलेख समुद्रगुप्ताचे व्यक्तीमत्त्व, त्याचे द्विग्विजय, तथा तत्कालीन राजकीय कटकारस्थानांची माहिती देतो. स्कंद गुप्ताच्या भितारी येथील स्तंभलेखातून त्याचे गादी मिळवण्यासाठी केलेल्या कठोर प्रयत्नांची व संघर्षाची माहिती मिळते. यशोवर्मनना मंदसोर स्तंभलेखही उल्लेखनीय आहे.

**६) गुहालेख :**

प्राचीन काळात धार्मिक प्रवृत्तीचे शासक निरनिराळ्या धार्मिक संप्रदायांना गुहांचे दान करीत. या गुहामध्ये त्या सांप्रदायाच्या माहितीबरोबरच दान देणाराचाही परिचय खोदला जाई. अशोकाचे बारबार गुहालेख, दशरथचे नागार्जून गुहालेख, सातवहानांचे नाशिक नानेघाट व कार्ले गुहालेख महत्त्वाचे आहेत. अशोकाच्या गुहालेखातून त्याची धार्मिक सहिष्णूता तर दशरथाच्या गुहालेखातून त्याचे जैन धर्माचे प्रेम प्रकट होते. नाशिक गुहालेखातून सातवाहनाचा उदय, त्यांचे मुळस्थान, साम्राज्यविस्तार तसेच त्यांच्या राजवंशाची माहिती मिळते. उदयगिरी गुहालेखातून गुप्तसम्राट चंद्रगुप्तच्या काठेवाड आणि गुजरातच्या विजयाची माहिती मिळते. अशाप्रकारे प्राचीन भारतीय शासकांनी गुहामध्ये खोदलेल्या लेखामधून तत्कालीन परिस्थितीवर बरीच माहिती मिळते.

७) मंदिरलेख :

प्राचीन काळात धार्मिक गोष्टी सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिरातील भिंतीवर लेख लिहिण्याची परंपरा सुरु झाली. तसेच बौद्ध स्तूप निर्मितीलाही सुरुवात झाली. या मंदिर लेखामध्ये भारहूत स्तुपाच्या भिंतीवर 'सुगनंरजे' लेखावरुन ही भिंत सुंगराजाच्या काळात बांधली गेली हे स्पष्ट होते.

८) मुर्तीलेख :

हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मियांनी आपल्या धर्माची माहिती सर्वसामान्यांना मिळावी म्हणून वेळोवेळी मुर्तीवर अभिलेख खोदले. उदा.कनिष्काने स्वतःच्या मुर्तीवर स्वतःच खोदलेले अभिलेख, रामगुप्तचा जैन मुर्ती लेख, कुमार गुप्ताचे करमदंडा आणि मानकूंवर मुर्तिलेख विशेष महत्त्वपूर्ण आहेत. रामगुप्ताच्या मुर्तीलेखवरुन त्याने स्वतःला 'महाराजाधिराज' ही उपाधी लावल्याचे दिसून येते. करमदंडा येथे मिळालेल्या शिवलंग लेख, कुमारगुप्तच्या काळातील शैवसंप्रदायाच्या लोकप्रियतेची माहिती देतो. तर मानकुंवरचा बुद्धमुर्तीलेख बौद्ध धर्माच्या प्रसाराची माहिती देतो. या सर्व मुर्ती लेखातून गुप्तराजे कसे धार्मिक सहिष्णू होते याची माहिती आपणास मिळते.

९) ताम्रपत्रावर खोदलेले लेख :

प्राचीन काळात एखाद्या व्यक्तीला राजाकडून दान दिल्यानंतर ते दान ताम्रपत्रावर खोदण्याची परंपरा होती. दिलेल्या दानाची विश्वासनीयता कायम राखने हा उद्देश ताम्रपत्र खोदण्यापाठीमागचा असायचा. अशा ताम्रपत्रात दान देणाऱ्याचे नाव तसेच त्याची वंशावळी तसेच दान घेणाऱ्याचा संपूर्ण परिचय असायचा. यामुळेच या ताम्रपत्रांना ऐतिहासिक महत्त्व आहे. राष्ट्रकुट राजा अमोघ वर्षाचा संजन ताम्रपट या संदर्भात महत्त्वाचा आहे. त्यातून रामगुप्ताविषयी बरीच ऐतिहासिक माहिती मिळते. सांगली आणि काम्बे येथील ताम्रलेख या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. कुमार गुप्ताच्या काळातील दामोदर येथील दोन ताम्रलेख - दनदेह आणि बेग्राम या संदर्भात महत्त्वाचे आहेत. इंदोर येथे गुप्त संवत १४६ चा एक ताम्रलेख मिळाला आहे, यावरुन याच वर्षी स्कंदगुप्तने विजयी वर्ष साजरे केल्याचे समजते. हर्षवर्धनाचा बंसखेडा बंसखेडा ताम्रलेखही महत्त्वाचा असून त्यामध्ये हर्षाचा व्यक्तिगत धर्म, हर्षाचे विजय व हर्षाच्या समकालीन शासकाविषयी उपयुक्त माहिती मिळते.

१०) पात्र किंवा भांड्यावरील लेख :

प्राचीन काळात भारतामध्ये धातुच्या पत्रांवर लेख कोरण्याची कला अवघत होती. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात असे लेख खोदलेले अनेक पात्र मिळालेले आहेत. परंतु

आजतागायत हे लेख वाचण्यात विद्वानांना यश आले नाही. पिप्राकलश पात्र याचे उत्तम उदाहरण आहे. हे बहुतेक लेखपात्र अशोकपूर्व काळातील आहेत.

**११) अलंकार :**

प्राचीन काळापासून भारतीयांना अलंकार वापरण्याची आवड आहे. स्त्री व पुरुषांना दोघांनाही अलंकाराची आवड होती. वैदिक साहित्यात विविध अलंकाराची नावे मोठ्या प्रमाणात आहेत. यामध्ये मणी, अंगठ्या, मोती, रत्ने, सुवर्णपदक इ. राजेलोक डोक्यावर रत्नजडीत मुकूट वापरत. विविध प्रकारची कुर्णभुषणे, नुपूर, कटिभुषणे, अंगुलीभुषणे, बाहूभुषणे याचे वर्णन प्राचीन भारतीय साहित्यात आहे. काही भुषणे कोणत्याही स्त्री-पुरुषांच्या आंगावर चित्रांकित केली आहेत. तर काही उत्खननात सापडली आहेत. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या लेण्यामध्ये स्त्री-पुरुषांच्या अंगावर अनेक अलंकार दाखवले आहेत. यावरुन त्या काळातील लोकांची कलात्मकता, रसिकता लक्षात येते. म्हणून अलंकार देखील प्राचीन भारताच्या इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन ठरते.

**१२) स्मारके :**

प्राचीन काळातील जी मंदिरे, स्तूप, गुहा, निवासस्थाने, मुर्ती, स्तंभ, तोरणद्वार, चित्र इ. प्राप्त होतात ती सर्व स्मारके आहेत. प्राचीन काळात कलाकारंनी ज्या कलाकृती तयार केल्या त्या काळाच्या ओघात टिकून राहिल्या. तत्कालीन संस्कृती नष्ट झाल्यानंतरही त्या संस्कृतीला स्वतःच्या उदरात स्थान देवून त्यांना अमरत्व प्रदान केले. अशा कलाकृतींना कालांतराने स्मारक असे संबोधू लागले. ही स्मारके म्हणजे त्या त्या काळातील सांस्कृतीक जीवनाचे प्रतिबिंब असतात. पाटलीपुत्रच्या उत्खनानात चंद्रगुप्त मौर्याच्या काष्ट महालाचे जे अवशेष मिळाले आहेत त्यावरुन तत्कालीन वास्तूकलेत काष्ट प्रयोगाचे प्रतिबिंब दिसून येते. यावरुन हे ही स्पष्ट होते की, मौर्यपूर्वकालीन कलाकृती या कष्टमय असल्याने व कालौघात त्या नष्ट झाल्या. म्हणूनच मौर्यपूर्वकालीन कलाकृती आपवादात्मक स्वरुपात मिळतात.

प्राचीन भारतीय स्मारकाचे विभाजन देशी आणि विदेशी स्मारके असे दोन विभागात केले जाते.

**देशी स्मारके :**

भारतामध्ये सर्वत्र हजारोनी मंदिरे, स्तूप, मुर्ती, चित्रे, स्तंभ इ. आढळतात. या सर्वांचा उपयोग इतिहास जाणून घेण्यासाठी होतो. इथे आपण काही निवडक देशी स्मारकांचा विचार करु.

**१) घंटाकार स्तंभ -** सारनाथ येथील घंटाकार स्तंभ हा अशोकाचा साम्राज्य

विस्तार व धर्मप्रसाराचे प्रतिक आहे. तसेच यातून तत्कालीन स्थापत्य कला आणि धार्मिक श्रद्धांचीही जाणीव होते.

**२) दशावतार मंदिर -** झाशीचे दशावतार मंदिर निर्माण व विकास कलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. मंदिर शिखर परंपरा याच मंदिरापासून निर्माण होताना दिसते.

**३) भीतरगाव मंदिर -** कानपूर येथील भीतरगाव मंदिर हे भवनिर्माण परंपरा आणि धार्मिक भावनेचे प्रतीक आहे.

**४) पुरी, भुवनेश्वर, महाबलीपुरम, कांचीपूरम -** या ठिकाणची मंदिरे प्राचीन भारतीय कला, धर्म आणि संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करतात.

**५) अंजिठा आणि वेरुळ येथील गुहा -** येथील गुहामधील चित्रे प्राचीन भारतीय चित्रकलेची माहिती तर देतातच पण त्या चित्रांच्या माध्यमातून तत्त्कालीन जीवन पद्धतीचीही माहिती देतात.

६) नालंदामध्ये मिळालेली बुद्धाची तांब्याची प्रतिमा प्राचीन भारतीय मुर्तीचे प्रतिनिधित्व करते. संपूर्ण भारतात अशा मुर्ती आढळून आल्या आहेत. त्या मुर्तीवरुन तत्त्कालीन वैष्णव, शैव, बौद्ध इ. संप्रदायाची तसेच कला व आध्यात्मिक समन्वयाची माहिती मिळते. या मुर्तीवरुन तत्कालीन भारतातील धार्मिक सद्‌भावना आणि सहिष्णूतेच्या वातावरणाची जाणीव होते.

७) देशाच्या विभिन्न भागात उत्खनानात जे अवशेष मिळाले त्यातून अनेक ऐतिहासिक तथ्ये बाहेर येण्यास मदत झाली. हडप्पा आणि मोहेंजोदडो येथील उत्खननानंतर एका सर्वस्वी नवीन संस्कृतीचा परिचय या जगाला झाला. त्यामुळे प्राचीन भारतीय इतिहास हा सुमारे ५००० वर्षाचा झाला. तसेच तक्षशिला येथे जे उत्खन झाले त्यामुळेच आपल्याला कुशाणांचा इतिहास समजतो.

**विदेशी स्मारक :**

भारताच्या शेजारी देशात काही स्मारके सापडली आहेत. जी प्राचीन भारतीय इतिहासाची माहिती देतात. जावा, सुमात्रा, बाली, बोर्नीओ, कंबोज, मलाया इ. भारता शेजारील देशात इमारती, मंदीरे, भिंती इ.चे अवशेष आढळून आलेले आहेत. या सर्वातून प्राचीन भारताच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन होते.

**१३) मुद्रा किंवा नाणी :**

सिंधू संस्कृतीपासून ते राजपूतांच्या उदयापर्यंतचा इतिहास हा आपण मुद्रा व नाण्याच्या आधारे रेखाटू शकतो. नाणे, मुद्रा व शिक्के हे इतिहासाचे अत्यंत विश्वसनीय साधन मानले जाते. सिंधू संस्कृतीमध्ये ज्या मुद्रा किंवा शिक्के सापडले आहेत. त्यावर जे लेख कोरण्यात आले आहेत तेच लेख या सुंदर आणि प्रगत संस्कृतीच्या आणखी काही दडलेल्या गोष्टी व

तिचे विलोभनीय दर्शन सा-या जगाला घडवू शकतात. तशी सिंधू संस्कृतीची तोंडओळख बऱ्याच अंशी संपूर्ण जगाला झाली आहे. परंतु या संस्कृतीचा खरा आत्मा अजूनही या शिक्क्यामध्ये दडलेला आहे. दुर्दैवाने या शिक्क्यावरील वाचन अजून तरी विद्वानांना करता आलेले नाही पण तरीही या शिक्क्यावरुन या संस्कृतीतला कला व धर्म आपण जाणू शकतो.

ग्रीक शासकाची जी नाणी भारतात सापडली त्यातून त्यांचे भारतावरील आक्रमण व त्यांच्या वंशावळीची आपल्याला माहिती मिळते. यात ग्रीक राजांच्या राज्याच्या सिमांचा उल्लेख मिळतो. भारतात शिथियन आणि पार्शियन शासकांनी काही काळ राज्य केले. त्यांच्या नाण्यावरुन पश्चिम भारतातील क्षत्रपांचा इतिहास समजण्यास मदत होते.

भारतात काही काळ शकांनीही राज्य केले. त्यांच्या नाण्यावरुन आपल्याला भारतीय राज्ये व गणराज्ये यांची माहिती मिळते. मालव, यौधेय, अर्जुनायन, पांचाल इ. लहान राज्याचा इतिहास त्यांच्या नाण्यावरुन कळतो. दाक्षिणात्य शक व सातवहान यांच्या संबंधात अनेक गोष्टी केवळ नाण्यामुळेच स्पष्ट होतात.

अलेक्झांडरच्या आक्रमणाचा परिणाम म्हणून भारतीय नाणी ही निश्चित वजन आकार गुळगुळीत स्वरुपाची काढण्याची पद्धत सुरु झाली. मौर्य कालखंडात विविध प्रकारची नाणी प्रचलीत होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नाण्यांची बरीच माहिती आहे. 'लक्षणाध्यक्ष' हा टाकसाळीचा प्रमुख अधिकारी असे. या सरकारी टाकसाळीतून लोकांनाही नाणी पाडून मिळत. भारहूत येथील स्तुपात काही नाही चित्रांकीत करण्यात आलेली आहेत. इ.स.पू. पहिल्या व दुसऱ्या शतकात राज्य करणाऱ्या शुंगराजाची तांब्याची नाणी सापडली आहेत. शकांची चांदीची व तांब्याची नाणी अनेक शतके प्रचलीत होते. त्यावर एका बाजुस राजाचा मुखवटा व ग्रीक आक्षरे तर दुसऱ्या बाजूस मेरु पर्वत आढळतो. सातवहानांच्या काळात भारतात अनेक गणराज्ये नांदत होती. त्यांची चांदीची व तांब्याची नाणी उपलब्ध आहेत.

प्राचीन भारतात सत्तास्थानी असलेल्या सातवहान, वाकाटक, राष्ट्रकूट, चालूक्य, चोल, पल्लव वगैरे राजवंशाची नाणी विपूल प्रमाणात सापडली आहेत. तसेच पश्चि शक शत्रप, गुप्त, वर्धन, गुर्जर, प्रतिहार इ. राजवंशाची नाणी विपूल प्रमाणात उपलब्ध आहेत. नाणकशास्त्र ही भारतीय इतिहासाला उपयुक्त अशी विद्याशाखा मानली जाते. नाणी हे इतिहासाच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आहे. कारण नाणी ही प्राचीन भारतातील बऱ्याच गोष्टीवर प्रकाश टाकतात ती पुढील प्रमाणे.

१) एखाद्या राज्याच्या काळात नाण्यासाठी जो धातू वापरला जातो. यावरुन त्या राजाच्या काळातील आर्थिक स्थितीची माहिती मिळते. उदा. चंद्रगुप्त पहिला, समुद्रगुप्त व चंद्रगुप्त विक्रमादित्य यांच्या काळातील सुवर्णनाणी सापडली आहेत. पण त्यानंतर सत्तेवर

आलेल्या गुप्त राजांची सुवर्ण नाणी सापडत नाहीत. यावरुन चंद्रगुप्त दुसरा यांच्यानंतर सत्तेवर आलेल्या गुप्त राजांची आर्थिक स्थिती खालवत गेली असा निष्कर्ष निघतो. नाण्यांची विपूलता ही व्यापारातील वृद्धी व आर्थिक समृद्धी दर्शविते.

२) नाण्यावर इ.स. (वर्ष) टाकण्याची पद्धत होती. यावरुन राजाच्या राजवंशाचा कालखंड लक्षात येतो.

३) नाण्यावर जी भाषा व लिपी असते यावरुन त्या काळातील भाषेची आपणास माहिती मिळते.

४) नाण्यावर विविध देवदेवतांची चित्रे, विशिष्ट धार्मिक चिन्हे असतात त्यावरुन तत्कालीन धार्मिक स्थिती समजण्यास मदत होते. उदा. कुशानांच्य नाण्यावर हिंदू, बौद्ध, ग्रीक, इराणी देवता आहेत. त्यावरुन त्यांची धार्मिक सहिष्णूता स्पष्ट होते. गुप्तांच्या नाण्यावर 'परम भागवत' असा शब्द आहे व त्यांच्या नाण्यावर गरुडध्वजाचे जे चिन्ह आहे यावरुन हे राजे वैष्णव पंथीय होते हे दिसते.

५) नाण्यावर राजा-राणी किंवा पुरुष-स्त्रीया यांची चित्रे असतात. त्यावरुन तत्कालीन वेशभुषा केशभुषा, अलंकार यांची माहिती मिळते.

६) एखाद्या राजाची नाणी ज्या प्रदेशात सापडतात. त्यावरुन त्या राजाच्या साम्राज्य विस्ताराच्या भौगोलिक मर्यादा लक्षात येतात. उदा. दक्षिण भारतात राज्य करणाऱ्या विविध राजवंशाची नाणी उत्तर भारतात सापडत नाहीत. त्यावरुन उत्तर भारतात त्यांचे साम्राज्य नव्हते असा निष्कर्ष निघतो. कनिष्क, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त, विक्रमादित्य यांची नाणी ज्या प्रदेशात सापडतात यावरुन त्या त्या प्रदेशावर त्यांचे राज्य होते असा निष्कर्ष निघतो.

७) भारताची नाणी रोममध्ये व रोमची नाणी भारतामध्ये सापडली यावरुन सातवहानांच्या काळात भारत-रोम व्यापारी संबंध होते हे स्पष्ट होते.

८) नाण्याचा आकार, ती तयार करण्याची पद्धत, सुबकता, त्यावरील आकृत्याचे रेखाटन इ. वरुन त्या काळातील कलेचीही आपणास माहिती मिळते. नाण्यावर पशू, पक्षी, फळे, फुले, वेली काढण्याची पध्दत होती. त्यावरुन त्या त्या कालखंडातील स्थिती लक्षात येते.

९) राजाच्या व्यक्तीमत्वाच्या विभिन्न पैलूंवरही नाणी प्रकाश टाकतात. उदा. समुद्रगुप्त या गुप्त सम्राटाने धनुर्धारी पद्धत, परशुधारी छाप, व्याघ्र मुद्रीत छाप, विणावादक छाप, अश्वमेध छाप इ. पद्धतीची जी नाणी काढली आहेत. त्यावरुन समुद्र गुप्ताच्या जीवनाची माहिती मिळते. चंद्रगुप्त दुसरा याची धनुरधारी छाप, सिंहविक्रम, अश्वरुढ छाप, छत्रछाप, मंच छाप, राजदंड छाप, चक्रविक्रम छाप ही जी नाणी सापडली त्यावरुन त्याच्या व्यक्तीमत्त्वाच्या विविध छटा व पैलू लक्षात येतात. चंद्रगुप्त पहिला व कुमारदेवी या दोघांचे एक जोड नाणे